## ६

# महात्मा गांधी आणि विश्वस्ताची कल्पना

**प्रा.डॉ. तवर ए.टी.**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी

**प्रा. मडावी ए. डी.**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
आदर्श महाविद्यालय, हिंगोली

### प्रस्तावना:-

भारताच्या स्वातंत्र्यात महात्मा गांधीजींचे योगदान भारतीयांना विसर पडता कामा नये. स्वतंत्र भारताच्या इतिहासात महात्मा गांधी यांचे नाव सुवर्ण अक्षरांनी कोरलेले आपणास पहावयास मिळते. सामाजिक, राजकीय, आर्थिक, व सांस्कृतिक जीवनाचा जो मार्ग महात्मा गांधीजींनी मानवाला दाखविला त्यामुळे ते भारतातच नाही तर जगामध्ये अजरामर झाले. महात्मा गांधीजींनी जे विचार व्यक्त केले त्यांनी जे काही लिखान केले तेच त्यांचे आर्थिक विचार आहेत. महात्मा गांधीजी हे अर्थशास्त्रज्ञ नव्हते. त्यांनी अर्थशास्त्राचा सखोल अभ्यास देखील केलेला नव्हता. परंतू त्यांच्यावर टॉलस्टॉय, थोसे, क्रोपोटकिन, रस्कीन, ना. गोखले यांच्या विचारांचा प्रभाव पडलेला होता. महात्मा गांधीजींनी सर्वोदय, धर्म, राजकारण, समाजकारण, ग्रामोद्योग, विश्वस्त इत्यादी संबंधी जे विचार मांडले आहेत त्या विचारातच त्यांचे आर्थिक विचार दडलेले दिसून येतात.[१]

महात्मा गांधीजींनी वेगवेगळ्या माध्यमातून जे आपले विचार मांडले ते त्यांच्या अनुयायांनी एकत्रित करून गांधीवादी अर्थशास्त्र तयार केले परंतू गांधीवादी अर्थशास्त्र या नावाचे अर्थशास्त्र असल्याचे तत्त्व गांधीजींनीच मान्य केले नाही. गांधीजींच्या विचारावर जेवढी चर्चा झाली, जेवढे मंथन झाले, जेवढे लिखान झाले तेवढे आधूनिक काळातील कोणत्याही भारतीय तज्ञांच्या आर्थिक विचारावर झालेले नाही. महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारांचा अभ्यास करण्यासाठी आपल्या देशातील काही विद्यापीठामध्ये स्वतंत्र्य विभाग स्थापन केलेले आहेत. महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारांचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी मांडलेल्या विविध संकल्पनांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. त्यांच्या अनेक संकल्पना पैकी विश्वस्ताची संकल्पना ही एक महत्त्वाची आहे.[२]

### विश्वस्ताचा अर्थ:-

'विश्वस्त' ही एक संकल्पना आहे. ज्यावेळी एखाद्या मालमत्तेचे प्रशासन किंवा विनियोग विशिष्ठ हेतूने केला जावा असे अभिप्रेत असते. ज्या व्यक्तीस प्रशासनाची

किंवा विनियोगाची क्षमता दिलेली असेल किंवा सुपूर्द केलेली असेल त्या व्यक्तीस विश्वस्त असे म्हटले जाते. विश्वस्ताचा मालमत्तेवर संपूर्ण ताबा असतो पण त्या मालमत्तेचे स्वामित्व त्याच्याकडे नसते. ही मालमत्ता वस्तूच्या स्वरूपात किंवा पैशाच्या स्वरूपात असेल.

विश्वस्त कल्पना ही अनेक संदर्भात पहावयास मिळते. आंतरराष्ट्रीय कायद्यामध्ये काही देशांबाबत इतर देशांना विश्वस्त केले गेले. स्वायत्त नसलेल्या प्रदेशांच्या राज्यव्यवस्थेसाठी संयुक्त राष्ट्रांच्या संघटनेने केलेली योजना म्हणजे विश्वस्तमंडळाची (ट्रस्टीशिप कौन्सिल)पद्धती होय. विश्वस्त वृत्ती ही माणसाच्या मूलभूत चांगुलपणावर व सत्प्रवृत्तीवर भर देणारी नैतिक संकल्पना आहे तिचा उगम प्युरिटन धर्ममतामध्ये आहे. जगातील यच्चयावत वस्तूंवर अखेर परमेश्वराचीच सत्ता आहे. माणसाला त्याने फक्त उपजीविकेचा अधिकार दिला आहे असे सांगितले आहे.[३]

**महात्मा गांधी आणि विश्वस्ताची कल्पना:-**

महात्मा गांधीनी श्रीमंतानी संपत्तीचे विश्वस्त व्हावे, स्वामी होऊ नये अशी कल्पना मांडली. म्हणजेच श्रीमंतांनी आपली मालमत्ता लोकहितार्थ वापरावी, केवळ स्वतःच्या उपभोगासाठी वापरू नये. माणसाने आपल्या गरजा किमान ठेवाव्यात या तत्त्वाला अनुसरून त्यांची विश्वस्ताची कल्पना होती. या भूमिकेमागे आर्थिक समतेचे तत्त्व होते. भांडवलदार, संस्थानिक, जमीनदार ह्यांनी विश्वस्त कल्पना अंमलात आणल्यास समाजातील विषमता नष्ट होईल अशी भूमिका होती.

महात्मा गांधींनी बनारस हिंदू विश्व विद्यालयाच्या उद्‌घाटन प्रसंगी (१९१६ सालच्या फेब्रुवारी) जे भाषण केले त्यात त्यांनी विश्वस्त वृत्तीची कल्पना मांडली. म. गांधींचे सहकारी किशोरलाल मशरूवाला, नरहरी पारीख व प्यारेलाल यांनी आपसात चर्चा करून एक मसुदा १९४२ साली तयार केला व त्यात म. गांधी प्रणीत सर्वोदयाच्या तत्त्वज्ञानात आर्थिक व सामाजिक समतेला प्राधान्य आहे आणि त्यासाठी विश्वस्त कल्पना आधारभूत मानली आहे.[४]

म.गांधी यांच्या मते भांडवलदारांजवळ प्रचंड संपत्ती आहे. त्यांच्याजवळची संपत्ती बळजबरीने काढून घेणे त्यांना योग्य वाटत नसे त्यांच्या अहिंसेच्या तत्त्वज्ञानात ते बसत नाही. अशा लोकांचे हृदयपरिवर्तन करावे असे त्यांना वाटत होते. त्यांच्या मते श्रीमंतांना संपत्तीचा संग्रह करण्याची आवड असते. या संपत्तीचा वापर समाजासाठी केला नाही तर ते समाजाचे नुकसान करेल. श्रीमंतानाी संपत्तीचा संग्रह केल्यावर त्यांचा समाजातील विविध लोकांवर काय परिणाम होईल याची माहिती कळणे आवश्यक असते. वाईट परिणामांची कल्पना श्रीमंताना आल्यावर सहाजीकच ते

मालक म्हणून न वागता विश्वस्त म्हणून वागतील. संपत्तीचा वापर समाजासाठी करतील. म.गांधी यांच्या मते बळाचा वापर करून श्रीमंताची संपत्ती काढून घेतली तर ते अहिंसा तत्त्वाच्या विरूद्ध होईल.[५]

म.गांधी यांच्या मते विश्वस्ताची कल्पना प्रत्यक्षात येताच वर्ग संघर्षाचा प्रश्न निर्माण होणार नाही. नविन कल्पनेनुसार भांडवलदार श्रमिकांची काळजी करेल. त्यांच्या हिताच्या रक्षणाची काळजी घेईल. गरीबांजवळ स्वतःच्या गरीबीशिवाय वाटपासाठी दुसरे काहीच नसते. या आदर्शवादी कल्पनेच्या स्पष्टीकरणात गांधीजी म्हणतात की, खऱ्या विश्वस्ताला वारसा नसतो. गांधींच्या मते प्रत्यक्षात विश्वस्ताची कल्पना साकार झाली तर पृथ्वीवर समता प्रस्थापित होईल.[६]

सन्मानाने जगण्यास लागणाऱ्या संपत्तीपेक्षा जेवढी जास्त संपत्ती असेल त्यावर श्रीमंतानी हक्क सांगू नये. त्या संपत्तीवर समाजाची मालकी असावी व ती समाजाच्या कल्याणासाठीच वापरली जावी असे म. गांधींना वाटत होते. भांडवलदार स्वतःहून कारखाण्यावरील मालकी हक्क सोडून देऊन विश्वस्त म्हणून भूमिका बजवावी त्यामुळे कामगारही मालकाच्या बरोबरीने विश्वस्त बनतात. या मार्गाने वाटचाल केल्यास भांडवलशाहीचे रूपांतर समतेवर आधारलेल्या अर्थव्यवस्थेत होईल असे म. गांधीचे मत होते. श्रीमंतास आपल्या संपत्तीवरील हक्क सक्तीने, बळीने वा हिंसक मार्गाने सोडावयास न लावता त्याचे हृदयपरिवर्तन करून प्रवृत्त केले पाहिजे असे म. गांधीनी सुचविले आहे.

गरजेपेक्षा जास्त संग्रह करण्याच्या प्रवृत्तीला म. गांधींचा विरोध होता. त्यांनी आपल्या संपूर्ण हयातीत असंग्रह आणि अपरिग्रह तत्त्वाला फार महत्त्व दिले. मुठभरांच्या हाती गरजेपेक्षा जास्त वस्तू भरलेल्या आहेत. दुसरीकडे बहूसंख्य लोकांना त्या वस्तूची कमतरता आहे त्या वस्तू मिळाव्यात म्हणून लोक तडफडतांना दिसतात म्हणून सर्वांनी आपापल्या गरजेप्रमाणे घेतले तर भूकेने कोणीही मरणार नाही अर्धनग्न अवस्थेत कुणीही फिरणार नाही. अशी म. गांधी यांची विचारसरणी होती. म्हणूनच त्यासाठी म. गांधीनी विश्वस्ताची कल्पना मांडली आहे. आपणास आवश्यक आहे त्यापेक्षा जास्त संग्रह केला तर ती एक प्रकारची चोरीच आहे असे गांधीजींचे मत होते. म. गांधीनी श्रमाचा पुरस्कार केला. कष्ट न करता पैसा कमविणे ही चोरी आहे. शारीरिक कष्ट करूनच आपला उदरनिर्वाह केला पाहिजे असे गांधीजींचे मत होते. भिक्षा मागणे आणि भिक्षा देणे याला गांधीजींचा विरोध होतो.

देशाचा विकास हा आर्थिक समतेवर आधारीत आहे. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत आर्थिक समता कशाप्रकारे निर्माण करता येईल. यासाठी म. गांधीनी विश्वस्ताची कल्पना मांडली आहे. विश्वस्ताची कल्पना म्हणजेच अहिंसक मार्गाने आर्थिक

समानता प्रस्थापित करणे आणि देशाचा विकास करणे होय. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत भांडवलदार वर्ग, व्यापारी, जमिनदार वर्ग यांच्याकडे राष्ट्राची संपत्ती जमा होते परंतू श्रमिकाचे उत्पन्न गरजेपेक्षा कमी असते. म्हणजेच श्रमिकांच्या संपत्तीमध्ये वाढ होत नाही. हे सर्व एकाच देशाचे घटक आहेत त्यामुळे सर्वांचे उत्पन्न सारख्या प्रमाणात वाढले पाहिजे. राष्ट्रीय संपत्तीतील वाढीचा फायदा केवळ श्रीमंतानाच न मिळता गरीबांना देखील मिळाला पाहिजे असे म. गांधीचे मत होते.[७]

विश्वस्ताचे तत्व साऱ्या जगाला सांगण्यापूर्वी म. गांधी दक्षिण आफ्रिकेत असताना आपल्या सर्व मिळकतीचा विश्वस्त निधी तयार केला होता आणि याद्वारे देशातील श्रीमंत वर्गाला समाजाचे विश्वस्त बनण्याचे आव्हान केले होते त्या काळात म. गांधींच्या या आव्हानाला चांगला प्रतिसाद मिळाला होता सर्व देशामध्ये अद्वितीय असलेली अहमदाबादची मजूर महान संस्था ही एक या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल होते. तसेच श्री. जमनालाल बजाज यांनी 'जमनालाल सेवा ट्रस्ट' या नावाने वर्धा येथे विश्वस्त निधी निर्माण केला होता. एक वर्गविहीत समाजाची निर्मिती करणे हे विश्वस्त या कल्पनेमागील गांधीजींचा उद्देश होता.

**सारांशः-**

म.गांधी यांनी मांडलेल्या विश्वस्ताची कल्पना अतिशय चांगली आहे. याच धर्तीवर देशात आज देखील बरेचसे ट्रस्ट (विश्वस्त) आहेत परंतू कार्य करण्याची पद्धती वेगळी आहे. आजच्या काळात गांधीजींना अपेक्षित असलेली विश्वस्त निर्माण होणे कठीण आहे. आजच्या काळामध्ये आपल्या कुटुंबातील जेष्ठ व्यक्तीचे नाव अजरामर राहावे ह्या उद्देशाने त्यांच्या नावाने विश्वस्त निधी तयार केला जातो. आर्थिक समानतेसाठी, समाज सेवेसाठी विश्वस्त निधी हा उद्देश म. गांधींच्या विश्वस्तकल्पनेत होता तो आजच्या विश्वस्तामध्ये दिसून येत नाही.

**संदर्भ ग्रंथः-**


१) आर्थिक विचारांचा इतिहास - प्रा.डॉ.बी.बी.इंगळे, अरूणा प्रकाशन, लातूर, २०११, पृ.१५६

२) उपरोक्त, पृ.१५९

३) मराठी विश्वकोश, खंड-१६

४) उपरोक्त

५) आर्थिक विचारांचा इतिहास - ए.आर.रायखेलकर, विद्या बुक्स, औरंगाबाद, २००५, पृ.२५०

६) उपरोक्त

७) आर्थिक विचारांचा इतिहास - प्रा.डॉ.बी.बी.इंगळे, अरूणा प्रकाशन, लातूर, २०११, पृ.१६०


❑❑❑